**पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावरील यंत्रणेसाठी सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः टंचाई २०१९/प्र.क्र. ०३ /पापु १४**

जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक : २३ मे, २०१९

वाचा -

१) शासन परिपत्रक, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक : टंचाई १००५/प्र.क्र. ३०५/ पापु-१४, दिनांक २४ जानेवारी, २००६

२) शासन परिपत्रक, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक : टंचाई २०१८/प्र.क्र. २०/ पापु-१४, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९

३) शासन परिपत्रक, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक : टंचाई २०१९/प्र.क्र. ३/ पापु- १४, दिनांक ०८ मार्च, २०१९

प्रस्तावना -

संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये / निर्णयान्वये टँकरद्वारे पाणी पुरवठयाबाबत सुचना निर्गमित केलेल्या आहेत. विविध कारणास्तव वेळीच त्याबाबत कार्यवाही होत नसल्याने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ टँकरद्वारे करण्यात येणा-या पाणी पुरवठयाबाबत वृत्तपत्रामध्ये विविध स्वरुपाच्या तक्रारी प्रसिध्द होत आहेत. यास्तव टँकरद्वारे करण्यात येणा-या पाणी पुरवठयाबाबत सुचना देण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक-**

१. शासन परिपत्रक दिनांक २४ जानेवारी, २००६ अन्वये परि. क्र. ब (६) नुसार टॅकरने पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या गावांना प्रत्यक्षात पाणी पुरवठा होतो किंवा कसे, हे पाहणे आवश्यक असल्याने त्यासाठी संबंधित गावाला टँकर उपलब्ध करुन दिल्यानंतर वेळच्या वेळी टँकर पोचला असल्याबाबत, टँकर्सच्या क्षमतेबाबत आणि नियोजित खेपा होत असल्याबाबत प्रत्येक खेपेच्या वेळेस गावातील पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेल्या समितीवरील २ महिला सदस्यांची टँकर चालक वेळच्या वेळी सही घेतील याची दक्षता घ्यावी. टँकर गावात पोचल्याची तारीख व वेळ नोंद करण्याचे विहित केले आहे.

वरील प्रमाणे विहीत केल्यानुसार गावातील २ महिला सदस्यांच्या स्वाक्ष-या लॉगबुक वर टँकरच्या प्रत्येक खेपेवेळीच घेण्यात याव्यात. कोणत्याही कारणास्तव सदर स्वाक्ष-या घेण्यामध्ये अनियमितता दिसून आल्यास संबंधित फेरी / खेप पूर्ण केल्याचे ग्राहय धरता येणार नाही.

२. महिला सदस्यांच्या स्वाक्षरीसह लॉगबुक च्या नोंदी WhatsApp द्वारे पंचायत समिती स्तरावर केलेल्या WhatsApp Group वर प्रत्येक दिवशी पाठविण्यात यावा.

३. लॉगबुक टँकर्ससोबतच ठेवावेत जेणेकरुन सर्व संबंधितांच्या स्वाक्ष-या खेपेवेळेस घेणे शक्य होईल तसेच नियमित व आकस्मिक तपासणीसाठी उपलब्ध होईल.

४. टँकर मंजुरीचे आदेश व टॅकरची/ टाकीची क्षमता प्रमाणीत केलेल्या आदेशाची प्रत लॉगबुकवर चिकटविण्यात यावी.

५. लॉगबुकवर संबंधित वाहनाचा नोंदणी क्रमांक प्रत्येक पृष्ठावर नमुद करण्यात यावा.

६. शासकीय पाणीपुरवठयाचे प्रत्येक खाजगी / शासकीय टँकर्सवर पुढीलप्रमाणे माहिती दर्शविणारा फलक प्रदर्शित करणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र शासन, शासकीय पाणीपुरवठा, उद्भवाचे ठिकाण, पाणी टाकण्याचे ठिकाण, मंजूर खेपा, वाहन क्रमांक.

७. जिल्हाधिकारी कार्यालयातील टंचाई कक्षामार्फतही जिल्हा स्तरावरुन टँकर वरील जी.पी.एस. प्रणालीद्वारे संनियत्रण होणे आवश्यक आहे. जी.पी.एस. प्रणालीकरिता युर्जस आय. डी. व पासवर्ड अध्यावत राहतील व जी. पी. एस. कार्यरत राहील याकरिता जिल्हा टंचाई कक्षाने आवश्यक कार्यवाही करावी. याबाबतची जबाबदारी जिल्हा टंचाई कक्षाची राहील.

जिल्हा टंचाई कक्षाने देखील जी.पी.एस . प्रणालीवरुन साप्ताहिक अहवाल प्राप्त करुन सक्षम अधिका-याच्या स्वाक्षरीसह (नायब तहसिलदार / तहसिलदार / उप जिल्हाधिकारी ) अभिलेख्यात जतन करावा.

८. ज्या ठिकाणी ट्रकवर टाकी बसवून पाणी पुरवठा केला जातो, अशा टॅकर्सच्या बाबतीत टॅकर्सच्या पाण्याच्या टाकीची क्षमता उप अभियता / कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांच्याकडून प्रमाणित करण्यात यावी. सद्य:स्थितीत अन्य यंत्रणेमार्फत टाकीची क्षमता प्रमाणित केली असल्यास सदर प्रमाणिकरणाबाबत एका आठवडयात उप अभियता / कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांनी तपासणी करावी. नव्याने सुरु होणा-या टँकर्सच्या बाबतीत संबंधित टॅकर्स सुरु होताच पहिल्या फेरी वेळेस अथवा सुरु होताच २ दिवसात टाकीची क्षमता प्रमाणित करणे आवश्यक आहे.

९. चारा छावण्याना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ च्या परिपत्रकान्वये पुढीलप्रमाणे सूचना दिल्या आहेत.

महसूल व वन विभागाने दुष्काळ घोषित केलेल्या ज्या गावात चारा छावण्यचा उभारण्यात आल्या असतील त्या गावाच्या पिण्याच्या पाण्याच्या मागणीमध्ये चारा छावण्यातील जनावरांच्या पिण्याच्या

पाण्याच्या मागणीचा समावेश करुन तेथे आवश्यकतेनुसार टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यात यावा. तथापि, चारा छावणी चालकांना प्रती जनावर देण्यात येणा-या अनुदानामध्ये चारा, पाणी व तद्नुषंगीक खर्चाचा समावेश आहे. सबब दिनांक १४.०२.२०१९ रोजीच्या परिपत्रकातील सदर सुचना क्रमांक -१ अधिक्रमीत करण्यात येत आहे. तरी पिण्याच्या पाण्याकरीता अधिग्रहीत केलेल्या विहिरी / जलसाठ्यामधून उपलब्धतेनुसार चारा छावण्यांकरिता चारा छावणी संस्थेस पाणी स्त्रोतांच्या ठिकाणी उपलब्ध करुन द्यावे. चारा छावणीसाठी वाहतुक आणि वाटप याबाबत खर्च व जबाबदारी चारा छावणी संस्थेची राहील.

१०. टँकरद्वारे पुरविण्यात येणारे पाणी वितरण करण्यासाठी विहीरीत टाकण्याचे टाळावे जेणेकरुन निच-याद्वारे (Percolation Loss) पाण्याची तूट होणार नाही.

११. टँकरमधून वाहतुकी दरम्यान पाणी गळणार नाही याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिका-यांनी संबंधित ठेकेदारास दयाव्यात. गळतीमुळे विहित प्रमाणपेक्षा कमी पाणी पुरवठा केल्यास अशा फे-या ग्राहय धरण्यात येऊ नयेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२२१७३६३३५९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sham Lal Goyal

Digitally signed by Sham Lal Goyal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Watersupply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fef8a156550c1999143688f755340a6b9d3ad380fcde16709e4e63210467e734, serialNumber=19d0cb2b5b2018974e0c848afbd781451d1c4c0d347d2a12395c8dffac4670f9, cn=Sham Lal Goyal
Date: 2019.05.23 16:44:27 +05'30'

**(श्याम लाल गोयल)**
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
३) मा. राज्यमत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव, गृह (परिवहन) विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
९) सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

१०) विभागीय आयुक्त (सर्व)
११) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बेलापूर
१२) जिल्हाधिकारी (सर्व)
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१४) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१५) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१६) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१७) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
१८) महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
१९) महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
२०) जिल्हा स्थानिक निधी लेखा परीक्षक (सर्व)
२१) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
२२) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
२३) उप सचिव (पापु १४), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
२४) अवर सचिव (पापु १४), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय.
२५) पापु १४ (निवडनस्ती)